# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ८१-२२** **दिनांक - १०/०३/२०२२**

## ६ वर्षाच्या मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीतास २४ तासाच्या आत अटक करुन ०४ दिवसात दोषारोप पत्र सादर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस सुनावली ०२ वर्षांची शिक्षा.

दिनांक ०४/०३/२०२२ रोजी रात्री २१.०० वा चे सुमारास फिर्यादी यांची ०६ वर्षांची अल्पवयीन मुलगी घरापासुन थोडया अंतरावर खेळत असतांना आरोपीत कंसा सिंग याने तीचे अज्ञानाचा फायदा घेवुन तीस चॉकलेटचे अमिष दाखवुन अपहरण केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाण्यात गुरनं । २५३/२०२२ भादंविस कलम ३६३ प्रमाणे दिनांक ०५.०३.२०२२ रोजी रात्रौ ०२.४७ वा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा अल्पवयीन मुलीचे बाबतीत असल्याने गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे आदेशान्वये आरोपीच्या शोधाकरीता ०३ पथके तयार करण्यात आली. गुन्हयाचे तपासात फिर्यादी राहत असलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता आरोपीत कंसा सिंग हा सदर मुलीस घेवुन जात असल्याचे दिसल्याने रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता सदर आरोपीत हा अपह्रीत मुलीस मालाड मुंबई येथे घेवुन गेल्याचे निष्पन्न झाले. मालाड मुंबई परिसरात अपह्रीत मुलीचा व आरोपीताचा शोध घेत असतांना आरोपीतास पोलीस हे आपल्या मागावर असल्याचा संशय आल्याने आरेपीने अपह्रीत मुलीस मालाड येथे सोडुन दिले. सदर मुलीस एका महिलेने मालाड पोलीस ठाण्यात आणुन दिल्यानंतर तीस ताब्यात घेवुन पालकांचे ताब्यात देण्यात आले होते.

त्यानंतर आरोपीचा कसोशीने शोध घेत असतांना गुप्त बातमीदाराने आरोपीत हा पश्चिम बंगाल येथे पळुन जाण्याच्या तयारीत असल्याची माहीती दिल्याने तपास पथकांना कुर्ला, दादर व बांद्रा रेल्वे स्टेशन परिसरात रवाना करण्यात आले असता आरोपीत कंसा सिंग हा बांद्रा रेल्वे स्टेशन येथे मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयात त्यास दिनांक ०६.०३.२०२२ रोजी ०४.४१ वा अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास सपोनि. जयचंद ठाकुर यांनी केला असुन सदर गुन्हयास भादंविस कलम ३६५ हे वाढीव कलम लावण्यात आले होते.

आरोपीत कंसा सिंग यास दिनांक ०६.०३.२०२१ रोजी मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्याची दिनांक ०९.०३.२०२२ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली होता. सदर पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान तपास अधिकारी सपोनि. जयचंद ठाकुर व पोउनि सी. आर. पाटील यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे जबाब, सीसीटीव्ही फुटेज, आरोपीचे निवेदन व पंचनामा इत्यादी ठोस व सबळ पुरावा गोळा करुन आरोपीत कंसा नोरेन सिंग यास दिनांक ०९.०३.२०२२ रोजी दोषारोप पत्रासह मा. न्यायालयात हजर केले असता उपलब्ध साक्षीपुराव्याच्या आधारे मा. न्यायालयाने भादंविस कलम ३६३ करीता ०२ वर्षे शिक्षा व ५०० रु दंड तसेच भादंविस कलम ३६५ करीता ०२ वर्षे शिक्षा व ५०० रु दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

आरोपीत व अपहृत मुलीस २४ तासाचे आत ताब्यात घेवुन तसेच अटक आरोपीत याचे विरुध्द ०४ दिवसांत दोषारोप पत्र सादर करुन सदरची केस शाबीत झालेली आहे.

सदरची प्रशंसनिय कामगीरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कैलास बर्वे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, सपोनि/ज्ञानेश फडतरे, सपोनि/रमेश धायगुडे, पोउनिरी/प्रशांत चव्हाण, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना.सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, पोना/शिवाजी पालवे, पो.अंम. गजानन गरीबे सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, महेश चौगुले यांनी केली असुन सदर गुन्हयातील अटक आरोपीत याचेविरुध्द सबळ पुरावे गोळा करुन ०४ दिवसांत दोषारोप पत्र सादर करुन सदरचा गुन्हा शाबीत होण्यासाठी तपास अधिकारी सपोनि जयचंद ठाकुर व पोउनि सी आर पाटील यांनी अथक प्रयत्न करुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.